RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग दोन

वर्ष १२, अंक ३७] मंगळवार, मे १९, २०२६/वैशाख २९, शके १९४८ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १२.००

असाधारण क्रमांक ६७

प्राधिकृत प्रकाशन

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

नोटीस

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६.

क्र. एसआरओटी/२४००/कग्रोसें/वियो-फेरबदल (मेट्रो मार्गिका-१२)/४८४/२०२६.

ज्याअर्थी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ (Maharashtra - IV of १९७५) अनुसार स्थापन झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (यापुढे ज्याचा उल्लेख 'उक्त प्राधिकरण' असा करण्यात आला आहे), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख 'उक्त अधिनियम' असा करण्यात आला आहे) च्या कलम ४० (१) (सी) अनुसार शासनास प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने आपल्या नगर विकास विभागाच्या दि. ३० एप्रिल, २०१६ रोजीच्या अधिसूचना क्रमांक टिपीएस-१२१५/९४१/सी.आर.-४२/१५/नवि-१२ अन्वये 'कल्याण ग्रोथ सेंटर' साठी विशेष नियोजन प्राधिकरण' म्हणून नियुक्ती केली.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने अधिसूचना क्र.टिपीएस-१२१२/१६९७/सीआर-१०१/१३/नवि-१२, दिनांक ११ मार्च, २०१५ अन्वये उक्त अधिसूचित क्षेत्रासाठीची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह मंजूर केली व काही भाग ई. पी. (Excluded Parts) च्या स्वरूपात प्रसिद्ध केला;

आणि ज्याअर्थी, सदर वगळलेल्या भागास (Excluded Parts) महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने अधिसूचना क्र.टिपीएस-१२१६/सीआर-२४०/१६/नवि-१२, दिनांक ०९ मे, २०१७, क्र.टिपीएस-१२१५/१७८/सीआर-१६/१५/नवि-१२, दिनांक ०३ जून, २०१७, क्र.टिपीएस-१२१६/सीआर-२४०/१६/नवि-१२, दिनांक ०३ जून, २०१७ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१) अंतर्गत मंजुरी दिली आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाने अधिसूचना क्र. एमआरडी / ३३१९/प्र. क्र.१९ (भाग-२)/नवि-७, दि. ०६.०९.२०१९ अन्वये मुंबई मेट्रो मार्ग - १२ (कल्याण - तळोजा) प्रकल्प "निकडीचा सार्वजनिक प्रकल्प" व "महत्त्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प" म्हणून घोषित केला आहे व या मेट्रो मार्गाच्या प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यास मान्यता दिली आहे. मेट्रो मार्गिका १२ ची सुधारीत संरेखनानुसार काही ठिकाणी नव्याने प्रस्तावित २४ मी. रुंद रस्ता दर्शविण्यात आला आहे. सदर मेट्रो प्रकल्पाच्या अमंलबजावणीसाठी, कल्याण ग्रोथ सेंटर या अधिसूचित क्षेत्राच्या विकास योजनेमध्ये मेट्रो मार्गिका १२ चे मेट्रो स्थानकासहीत संरेखन दर्शविणे, नवीन डी. पी. रस्ता व मंजूर डी. पी. रस्त्यामधील फेरबदल दर्शविणे आणि त्यानुसार भूवापरातील व आरक्षणातील फेरबदल दर्शविणे यासाठी विकास योजनेत फेरबदल करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, सदर विकास योजनेतील फेरबदलाची कार्यवाही करण्याबाबतची बाब टिप्पणी प्राधिकरणाच्या दिनांक १६ फेब्रुवारी, २०२६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सादर करण्यात आली होती. सदर बैठकीतील ठराव क्र. १७६५ अन्वये उक्त अधिसूचित क्षेत्रातील मंजूर विकास योजनेमधील डी. पी. रस्ते, आरक्षणे व झोन यामध्ये खालील (१) ते (५) मध्ये नमूद केल्यानुसार आणि विकास योजनेच्या भाग नकाशावर दर्शविल्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, ३७(१) अन्वये फेरबदल प्रक्रिया सुरू करण्यास मान्यता दिली आहे (यापुढे ज्याचा उल्लेख 'उक्त फेरबदल' असा करण्यात आला आहे);

१. **भाग A', भाग B', भाग E'** या भागांमध्ये प्रस्तावित मेट्रो मार्गिका - १२ चे संरेखन हे डी. पी. रस्त्यावर असल्याने विकास योजनेमध्ये फेरबदल करण्याची आवश्यकता नाही.

२. **भाग C'** - मेट्रो मार्गिका - १२ चे संरेखन हे आरक्षण क्र. CT- २ (सामाजिक-सांस्कृतिक सुविधा), G-११ व G-१२ (Garden) मधून जात असून, CT- २ व G - ११ ही आरक्षणे एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पांतर्गत स्थलांतरित करण्याचे प्रस्तावित आहे. सुधारित संरेखनानुसार नवीन २४ मी. रुंद डी. पी. रस्ता point D-F१-G-K-N असा प्रस्तावित आहे. काही रस्त्यांचे विस्तार (Point J-K - २४ मी. रुंद, Point F ते F१- १८ मी. रुंद) प्रस्तावित करण्यात आले आहे. मंजूर प्रस्तावित डी. पी. रस्ता point H-I-L-M असा वगळण्याचे प्रस्तावित आहे. नवीन डी. पी. रस्त्यांमुळे आरक्षण क्र. G- १२ अंशतः बाधित होत असल्याने, वगळण्यात आलेल्या डी. पी. रस्त्यांतील क्षेत्र G-१२ मध्ये समाविष्ट करून बाधित क्षेत्र समायोजीत करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच वगळण्यात आलेल्या डी. पी. रस्त्यांतील काही क्षेत्र वाणिज्य परिमंडळात व काही क्षेत्र रहिवासी परिमंडळात समाविष्ट करण्याचे प्रस्तावित आहे. सदर भागामध्ये हेदुटणे मेट्रो स्थानक प्रस्तावित आहे.

३. **भाग D'** - Point N ते O दरम्यान मेट्रो मार्गिका - १२ चे संरेखन डी. पी. रस्त्यावर असून, Point O ते P दरम्यान मेट्रो मार्गिका - १२ चे संरेखन हे आरक्षण क्र. PG-१२ (खेळाचे मैदान) मधून जात असल्याने सदर आरक्षण बाधित होत आहे; तथापि बाधित क्षेत्राएवढे लगतचे वाणिज्य परिमंडळाचे क्षेत्र आरक्षणात समाविष्ट करण्याचे प्रस्तावित आहे.

४. **भाग F'** - या भागामध्ये प्रस्तावित मेट्रो मार्गिका १२ च्या संरेखनानुसार Point R-S-U या भागामध्ये नव्याने २४ मी. रुंद डी. पी. रस्ता दर्शविण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रस्तावित रस्त्याने खाडी व भागशः आरक्षण क्र. PG-१४ (खेळाचे मैदान), आरक्षण क्र. G-१८ (Garden) व आरक्षण क्र. G१९ बाधित होत आहे. तसेच, Point R ते T येथील डी. पी. रस्ता वगळण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

५. **भाग G**-सदर भागातील Point V-V१-W-X-X१-Y नुसार मेट्रो डेपोला जोडण्यासाठी Spur Line चे संरेखन प्रस्तावित असून, त्याअनुषंगाने नव्याने २४ मी. रुंद डी. पी. रस्ता प्रस्तावित करण्यात आला आहे. सदर संरेखनमुळे आरक्षण क्र. शैक्षणिक संकुल - २ व G-३९, ३० मी. रुंद डी. पी. रस्ता व रहिवास परिमंडळातील क्षेत्र बाधित होत असून, यामधील काही क्षेत्रे कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात तसेच काही क्षेत्रे कल्याण ग्रोथ सेंटरमधील रहिवास परिमंडळात समाविष्ट आहेत.

आणि ज्याअर्थी, प्राधिकरणाने सदर ठराव क्र. १७६५ नुसार उक्त अधिनियमाच्या कलम १३९ अन्वये तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ मधील तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून विकास योजनेमध्ये फेरबदल करण्यासंदर्भात उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१) मधील सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून शासनास उक्त फेरबदल प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करणे यासाठी व उक्त अधिनियमानुसार आवश्यक असलेली सर्व कार्यवाही पूर्ण करण्यास मा. महानगर आयुक्त यांना प्राधिकृत केले आहे;

म्हणून आता, उक्त अधिसूचित क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेमध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) अन्वयेचा उक्त फेरबदल करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१) मधील तरतुदींन्वये उक्त फेरबदलाबाबत जनतेकडून सूचना आणि / किंवा आक्षेप मागविण्यासाठी ही सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

उक्त फेरबदल दर्शविणारा मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा खालील कार्यालयांत कार्यालयीन वेळेमध्ये जनतेच्या निरीक्षणासाठी ठेवण्यात आला आहे.

१. प्रमुख, नगर नियोजन, मुं.म.प्र. वि. प्राधिकरण, ३ रा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.	**३. वरिष्ठ नियोजक, मुं.म.प्र. वि. प्राधिकरण,** **उप प्रादेशिक कार्यालय, ठाणे,** बहुउद्देशिय हॉल, २ रा मजला, ओसवाल पार्क लगत, पोखरण रोड नं. २, माजिवडा, ठाणे (प.) ४०० ६०१.
२. मा. जिल्हाधिकारी, ठाणे. जिल्हाधिकारी कार्यालय, कोर्ट नाका जवळ, ठाणे (प.) - ४०० ६०१.	**४. मा. तहसीलदार,** तहसीलदार कार्यालय, कल्याण, कल्याण मुरबाड रस्ता, जुने महात्मा फुले पोलीस स्थानक जवळ, कल्याण (प.), जि. ठाणे – ४२१ ३०१

ही नोटीस महाराष्ट्र शासनाच्या **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत वरिष्ठ नियोजक, मुं.म.प्र. वि. प्राधिकरण, उप-प्रादेशिक कार्यालय, ठाणे, बहुउद्देशिय हॉल, २ रा मजला, ओसवाल पार्क लगत, पोखरण रोड नं. २, माजिवडा, ठाणे (प.) ४०० ६०१ यांचेकडे लेखी स्वरुपात दाखल झालेल्या सूचना आणि / किंवा हरकती यांचा उक्त अधिनियमातील तरतुदींनुसार विचार करण्यात येईल. उक्त फेरबदल दर्शविणारा मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा व नोटीस प्रधिकरणाच्या https://mmrda.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर देखील उपलब्ध आहे.

ठाणे,
दिनांक : ४ मे २०२६.

प्रदिप यादव,
प्रमुख, नगर नियोजन (अति. कार्य.)
मुं.म.प्र. वि. प्राधिकरण.

MUMBAI METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

Notice

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. : SROT/2400/KGC/DP-MODIFICATION/ Metro Line -12/484/2026.

WHEREAS, the Govt. of Maharashtra has appointed the Mumbai Metropolitan Region Development Authority (hereinafter referred to as 'the said Authority') established under the Mumbai Metropolitan Region Development Authority Act, 1974, (Maharashtra-IV of 1975) to be the Special Planning Authority for the 'Kalyan Growth Centre' (hereinafter referred to as 'the said Notified Area') by the Urban Development Department's Notification No.TPS 1215/941/CR-42/15/UD-12, dated 30th April, 2016 in exercise of its powers conferred by Section 40 (1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as the 'said Act');

AND WHEREAS, the Govt. of Maharashtra, Urban Development Department by its Notification No.TPS- 1212/1697/C.R.No. 101/13/UD-12, dated 11th March, 2015 has sanctioned the Development Plan (DP) of Notified Area of 27 Villages of Kalyan and Ambarnath Talukas has sanctioned the Development Plan along with Development Control Regulations for the said Notified Area & published certain parts in the form of E.P.(Excluded Parts);

AND WHEREAS, the Govt. of Maharashtra, Urban Development Department by its Notification No.TPS- 1216/16/C.R.No.240/16/UD-12, dated 9th May, 2017 and subsequent Notification No. TPS/1215/178/C.R. No. 1/15/UD12, dated 3rd June, 2017 has sanctioned the E.P. (Excluded Part) for the said notified area under section 31(1) of the said Act;

AND WHEREAS, the Govt. of Maharashtra by it's Notification no.एमआरडी-3319/प्र.क्र. 19 (भाग-2)/ नवि-7, dated 06th September, 2019 has given approval to declare Metro Line -12 project as "Vital Public Project" & "Vital Urban Transport Project". Also Govt. has given approval for the implementation of the said project through MMRDA. The Metropolitan Commissioner, MMRDA has given approval to the revised alignment of Metro Line -12 wherein along the alignment 24 m wide road is proposed at some locations. Therefore, to implement the said project it is necessary to modify the DP of the said notified area to indicate the revised alignment of Metro Line 12 along with the Metro Station, addition of new DP road & modifications in the sanctioned DP roads and subsequent changes in zones and reservations.

AND WHEREAS, the said modification proposal was placed in the 160th Authority meeting held on 16th February, 2026. The Authority in the said meeting by its resolution No. 1765 has accorded approval to initiate the procedure u/s 37(1) of the said Act for carrying out modification to the Sanctioned Development Plan of the said Notified Area under Section 37(1) of the said Act for the changes in DP roads, zones and reservations as mentioned in as mentioned in (1) to (5) below & as shown on part plan of Sanctioned Development Plan of the said Notified Area (hereinafter referred as 'the said modification');

1. **Part A', Part B', Part E'**: The proposed ML 12 Alignment is passing through the proposed DP road, hence in these parts no modification is proposed in Sanctioned Development Plan.

2. **Part C'**: Revised metro alignment affects DP Reservations CT-2 (Socio- Cultural Amenities), Garden (G-11 and G-12). CT-2 and G-11 are within ITP and the same is proposed to be shifted within ITP. New DP roads of 24m from point D-F1-G-K-N is proposed as per metro alignment. Further from point J to K (24m wide road) and from point F to F1 (18m wide DP road) arc proposed to be extended till the modified proposed DP road. Further the deletion of existing DP road from point H-I-L-M-N is proposed. Due to the proposed new D.P. roads, the Reservation No. G-12 is partially affected; therefore, it is proposed to include the area of the deleted D.P. roads into Reservation No. G-12 to compensate for the affected area. Further, some areas of the deleted D.P. roads are proposed to be included in the Commercial Zone and in the Residential Zone. Hedutane Metro Station is proposed in this section.

3. **Part D'**: Between Point N and Point O, the alignment of Metro Line-12 runs along the D.P. road. However, between Point O and Point P, the alignment of Metro Line-12 passes through Reservation No. PG-12 (Playground), thereby affecting the said reservation. It is proposed to include an equivalent area of the adjoining Commercial Zone into the reservation.

4. **Section F'**: New DP road of 24 m from Point R-S-U is proposed. Newly proposed road affects DP road, Khadi area, Reservations PG-14 (Playground), G-18 and G-19 (Gardens). Existing part of 30 m DP Road from R to T is proposed to be deleted.

5. **Section G'**: From Points V-V1-W-X-X1-Y, a Spur Line alignment is proposed to connect the Metro Depot, and accordingly a new 24-meter wide D.P. road has been proposed. Under this alignment, areas under Reservation No. Educational Complex-2, Reservation No. G-39 (Garden), a 30-meter wide D.P. road, and Residential Zone are affected. Some of these areas are located within the Kalyan-Dombivli Municipal Corporation limits, while some areas are included in the Residential Zone of the Kalyan Growth Centre.

AND WHEREAS, the 160th Authority meeting by its Resolution No. 1765, in exercise of the powers received as per the provision of MMRDA Act, 1974 and under Section 139 of the said Act has authorized the Metropolitan Commissioner to carry out all the statutory procedure under Section 37(1) of the said Act and submit the said modification proposal to the Government for sanction and to carry out all required necessary action under the said Act;

NOW THEREFORE, this notice is hereby published for inviting suggestions and/or objections from public for carrying out the said modification to the Sanctioned Development Plan of the said Notified Area under Section 37(1) of the said Act.

The part plan of the sanctioned Development Plan showing the said modification is kept for inspection of the public in the following offices during office hours.

1. The Chief, **Town Planning Division, MMRDA** 3rd Floor, New MMRDA Building, Bandra-Kurla Complex, Bandra (E), Mumbai - 400 051.	**3. The Senior Planner, MMRDA** **The Sub-Regional Office, Thane** Multipurpose Hall, 2nd Floor, Besides Oswal Park, Pokharan Road 2, Majiwada, Thane (W) – 400 601.
2. The Collector, Thane, Thane Collector Office, Near Court Naka, Thane (W)- 400 601.	**4. The Tahsildar,** Tahasildar Office Kalyan, Kalyan Murbad Road, Near Old Mahatma Phule Police Station, Kalyan West, Dist. Thane - 421301.

The suggestions and/or objections received in writing to the Senior Planner, MMRDA, the Sub-Regional Office, Multipurpose Hall, 2nd Floor, Besides Oswal Park, Pokharan Road 2, Majiwada, Thane (W) - 400 601 within 30 (thirty) days from the date of publication of this notice in the *Maharashtra Government Gazette* will be considered. The Notice and part plan of the sanctioned Development Plan showing the said modification is also available on MMRDA's website at https://mmrda.maharashtra.gov.in.

Thane,
Dated 4 May, 2026.

PRADIP YADAV,
Chief, Town Planning (A/C),
MMRDA.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.